# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, नांदेड.

पत्ता : गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१, Email :nandedrdc@gmail.com

**वाचा**ः- फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४

---

जा.क्र.२०२०/आरबी-१/डेस्क२/टे-४/crpc-१४४/प्र.क्र.- दिनांक.२२.०३.२०२०

COLLECTOR & DISTRICT MAGISTRATE NANDED Dist.

**फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे मनाई आदेश**

**आदेश**

१) ज्याअर्थी, जागतीक आरोग्य संघटनेने कोरोना (कोव्हीड-१९) हा विषाणू मूळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणून घोषत केला आहे. तसेच कोरोना विषाणूचा प्रसार भारतात, महाराष्ट्रातील शहरात गतीने पसरत आहे. असे दिसून येत आहे. तसेच राज्यशासनाने कोरोना विषाणू चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथीचा रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि. १३.०३.२०२० रोजी पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतूदी नुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली तयार करण्यात आलेली आहे. त्याशिवाय भारत सरकार आरोग्य मंत्रालय, महाराष्ट्र शासन आरोग्य मंत्रालय यांनी जाहीर केलेप्रमाणे कोरानाग्रसत रुग्णांचे संपर्कात लोकांनी येवू नये, तसेच सार्वजनिक किंवा खाजगी जागेत पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीनी एकत्र येणे, थांबणे, चर्चा करणे, काही कार्यक्रमाचे आयोजन केल्यास या विषाणूचासंसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता सर्वसामान्य जनतेस व त्यांचे आरोग्यास धोकादायक होत असल्याची माझी खात्री झालेली आहे. त्याकरिता तात्काळ प्रतिबंधक उपाययोजना करणे आवश्यक आहे. अशी उपाययोजना फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ कलम १४४ खालील तरतुदींच्या अनुषंगाने जनतेस, खालील व्यक्ती, आस्थापना यांना उद्देशून आदेश काढणे आवश्यक असलेबाबत माझी खात्री झालेली आहे.

२) त्याअर्थी, मी डॉ. विपीन इटनकर, जिल्हादंडाधिकारी नांदेड, फौजदारी फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (३) अन्वये मनाई आदेश परिच्छेद क्र.५ मधील नमूद सुचनांच्या अधिन राहुन **दिनांक.२२ मार्च २०२० रोजी सकाळी ०५.०० वा. पासून ते दि.३१.०३.२०२० चे २४.०० वा. पर्यंत नागरी भागात (महानगर पालीका, नगर परीषद व नगर पंचायत)** राहण्या-या नागरी भागात जमावबंदी आदेश लागू करीत असून या कालावधीत (५) पाच व त्या पेक्षा जास्त व्यक्तींनी एकत्र जमण्यास प्रतिबंध करीत आहे.

नांदेड जिल्हयातील नागरी भागातील **(महानगर पालीका, नगर परीषद व नगर पंचायत)** खाजगी व सार्वजनिक ठिकाणी पाच किंवा पाच पेक्षा अधिक व्यक्ती एकत्र येतील असे सर्व प्रकारचे कार्यक्रम, समारंभ, सांस्कृतिक कार्यक्रम, सण, सत्सव, उरुस,जत्रा, मनोरंजनाचे कार्यक्रम क्रिडा व इतर सर्व स्पर्धा यांना मनाई करीत आहे.

३) नांदेड जिल्हयातील नागरी भागातील **(महानगर पालीका, नगर परीषद व नगर पंचायत)** खाजगी व सार्वजनिक ठिकाणी पाच किंवा पाच पेक्षा अधिक व्यक्ती एकत्र येतील असे सर्व प्रकारची कृत्य जसे कार्यशाळा, कॅम्प, प्रशिक्षण वर्ग, वैठक, मिरवणूक, मेळावे,सभा, आंदोलने, देशांतर्गत व परदेशी सहली इ. यांचे आयोजनास मनाई करीत आहे.

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, नांदेड.
पत्ता : गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१, Email :nandedrdc@gmail.com

४) नांदेड जिल्हयातील नागरी भागातील **(महानगर पालाका, नगर परीषद व नगर पंचायत)** खाजगी व सार्वजनिक ठिकाणी पाच किंवा पाच पेक्षा अधिक व्यक्ती एकत्र येतील असे सर्व दुकाने/सेवा आस्थाना, उपहार गृहे/खाद्यगृहे/खानावळ, शॉपींग कॉम्लेक्स, कॉल्स, सूपर मार्केट, मनोरंजनाची ठिकाणे, क्लब/पब क्रीडांगणे,मैदाने, जलतरण तलाव,उद्याने, सिनेमागृहे, नाटयगृहे, शाळा, महाविद्यालये, खाजगी शिकवणी वर्ग, व्यायामशाळा,संग्रहालये इ.बंद राहतील.

सर्व नागरीकांनी अनावश्यकरित्या सार्वजनिक ठिकाणी विहीत कारणाशिवाय येण्यास मनाई करीत आहे.

५) **<u>सदरचे आदेश खालील बाबतीत लागु होणार नाहीत-</u>**

१) अत्यावश्यक सेवांतर्गत किराणा सामान, दुध/दुग्धोत्पादने, फळे व भाजीपाला जीवनावश्यक वस्तु विक्रीची ठिकाणे

२) दवाखाने, वैद्यकीय केंद्र व औषधीदुकाने संबंधी आस्थापना.

३) विद्युत पुरवठा, ऑईल व पेट्रोलपंप व उर्जा संसाधने तसेच, पिण्याचे पाणी पुरवठा व सांडपाणी निचरा व्यवस्थापन करणा-या आस्थापना

४) सर्व शासकीय निमशासकीय कार्यालय (अत्यावश्यक सेवा वगळता इतर कार्यालये) ५ % कर्मचारी काम करतील.

५) उपहारगृहांनी योग्य ती सर्व खबरदारी घेवुन फक्त पार्सल स्वरुपाचीच सेवा चालू राहील.

६) राज्य परिवहन महामंडाळाच्या बसेस व खाजगी प्रवासी बसेस, ॲटोरिक्शा, टॅक्सी, दिनांक ३१ मार्च पर्यंत बंद करण्यात येत आहेत परंतु अत्यावश्यक सेवेकरीता, जसे रुग्णांना दवाखाण्यात नेण्यासाठी मुभा राहील, त्याच प्रमाणे अत्यावश्यक वस्तू व अत्यावश्यक सेवेसाठी कार्यरत कर्मचारी यांची वाहतूकीसाठी मुभा राहील.

७) बँकींग आणि वित्तीय सेवा संबंधी आस्थापने

८) प्रसारमाघ्यमांचे (सर्व प्रकारचे दैनिक,नियतकालीके, टिव्ही न्युज चूनेल इ.) कार्यालय

९) वरील सर्व अत्यावश्यक सेवा देणा-या संबंधित आयटी आणि आयटीईएस आस्थापना

१०) त्याच प्रमाणे अत्यावश्यक सेवा सबंधी भंडारण व्यवस्था (Warehousing), वरील सेवांसाठी मनुष्यबळ वाहतुक करणारे ट्रक/वाहन

११) वरील जीवनावश्यक वस्तूचे कोणत्याही स्वरूपात साठा/ काळाबाजार होणार नाही याची संबंधित प्रशासकीय विभागांनी याची पाहणी करावी.

१२) अंत्यविधी /अंत्ययात्रेसाठी केवळ २० ते ३० व्यक्तीनाच सामिल होण्याची मुभा राहील.

१३) सर्व धार्मिक /प्रार्थना स्थळाचे ठिकाणी नित्य नियमाप्रमाणे धार्मिक विधी करीता संबंधित धर्मगुरु यांनाच मुभा राहील इतर व्यक्तीस प्रवेश बंदी राहील.

१४) त्याचप्रमाणे या कार्यालयामार्फत वेळोवेळी कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोकण्यासाठी काढण्यात ओलेले प्रतिबंधात्मक उपाययोजनाचे आदेश /निर्देशसुध्दा लागू राहतील.

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, नांदेड.

पत्ता : गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१, Email :nandedrdc@gmail.com


सदर आदेशाचे उल्लघंन करणारी व्यक्ती भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ व इतर अनुषंगिक कायद्यानुसार प्रमाणे शिक्षेस पात्र राहील.

६) उपरोक्त प्रमाणे सर्व संबंधिताना आदेशापूर्वी स्वतंत्र नोटीस बजावणी शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. याबाबतची माहिती प्रसार माध्यमे, उप विभागीय दंडाधिकारी, तालूका कार्यकारी दंडाधिकारी, सर्व पोलीस स्टेशन, जि.नांदेड यांचे नोटीस बोर्डवर नागरिकांचे सुविधेसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

हे आदेश **दिनांक.२२/०३/२०२०** रोजी माझे सही व शिक्यानिशी निर्गमीत करण्यात येत आहे.

**(डॉ.विपीन इटनकर)** भा.प्र.से.
**जिल्हादंडाधिकारी नांदेड.**

**प्रतिलिपी- माहीतीस्तव सादर**

१. मा.अपर मुख्य सचिव, गृह विभाग (विशेष) मंत्रालय, मुंबई-३२.
२. मा.विभागीय आयुक्त औरंगाबाद.

**प्रतिलीपी - आवश्यक कार्यवाहीस्तव**

३. आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
४. पोलीस अधिक्षक, नांदेड
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड
६. सर्व उपविभागीय दंडाधिकारी नांदेड जिल्हा
७. सर्व पोलीस उपविभागीय अधिकारी, नांदेड जिल्हा
८. सर्व तालुका दंडाधिकारी नांदेड जिल्हा
९. जिल्हा शल्य चिकीत्सक, नांदेड.
१०.अधिष्ठाता,डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय महाविद्यालय व रुग्णालय विष्णूपूरी नांदेड.
११.जिल्हा माहीती अधिकारी नांदेड
१२.केंद्र संचालक आकाशवाणीकेंद्र नांदेड यांना प्रसिध्दीस्तव.

COLLECTOR & DISTRICT MAGISTRATE NANDED Dist.

**जिल्हादंडाधिकारी नांदेड.**